सकाळ

# सहकारी संस्था देशाच्या विकासाचे इंजिन

## प्रा. संजय ठिगळे : गडहिंग्लजमध्ये सहकार सप्ताहनिमित्त उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. ८ : 'शतकापूर्वी भारतात सहकार रुजला, विस्तारला आणि विकसित झाला. देशातील कृषी, औद्योगिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रांत केवळ सहकारामुळे आमूलाग्र बदल झाले. देशाच्या आजचा विकसित चेहऱ्यामागेही सहकारच कारणीभूत आहे. ग्रामीण सहकारी संस्था याच देशाच्या विकासाचे इंजिन आहेत,' असे प्रतिपादन अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. संजय ठिगळे यांनी केले.




गडहिंग्लज : सहकार चर्चासत्रात प्रा. संजय ठिगळे यांनी मार्गदर्शन केले. शेजारी अनिता शिंदे, एम. एल. चौगुले, मीना रिंगणे, उत्कर्षा पोतदार आदी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष, सहकार मंत्रालय स्थापना दिन सहकार सप्ताहानिमित्त गडहिंग्लजचा सहकार विभाग, श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी व श्री महालक्ष्मी वुमेन्स को-ऑप सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्रात 'सहकारासमोरील बदलती आव्हाने' या विषयावर ठिगळे यांनी मार्गदर्शन केले. येथील सहायक निबंधक अनिता शिंदे अध्यक्षस्थानी होत्या. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले प्रमुख उपस्थित होते. प्रा. ठिगळे म्हणाले, 'विश्वास हा सहकाराचा पाया आहे. स्पर्धेच्या जगात हा विश्वास दृढ केल्यास सहकार क्षेत्रच देशाला तारक ठरेल. सहकाराने अनेक मोठ्या संस्था, व्यक्ती निर्माण केल्या. किंबहुना सहकार हाच राष्ट्रविकासाचा आत्मा आहे.'

सहायक निबंधक कार्यालयापासून शहरात पालखीतून सहकार ग्रंथांची मिरवणूक, टाळ-मृदंग आणि सहकाराच्या जयघोषात सहकार दिंडी काढण्यात आली. दिंडीमध्ये अनिता शिंदे, एम. एल. चौगुले यांच्यासह तालुक्यातील विकास सेवा संस्था, पतसंस्थांचे पदाधिकारी, सचिवांनी सहभाग घेतला. दुसऱ्या सत्रात रवळनाथ कॉन्फरन्स हॉलमध्ये चर्चासत्र झाले. महिला कर्मचाऱ्यांनी सहकार गीत सादर केले. सीईओ डी. के. मायदेव यांनी सहकार शपथ दिली.

### 'रवळनाथ'चे अनुकरण करावे...

**सहायक निबंधक शिंदे म्हणाल्या, 'सहकार क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला असला, तरी जोपर्यंत सहकारात श्री रवळनाथ हौसिंग फायनान्ससारख्या चांगल्या संस्था कार्यरत आहेत, तोपर्यंत सहकार चळवळ कधीच बदनाम होणार नाही. अशा आदर्शवत संस्थेचे अन्य संस्थांनीही अनुकरण करण्याची आवश्यकता आहे.'**

उपाध्यक्षा मीना रिंगणे यांनी स्वागत केले. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सचिव अण्णासाहेब देसाई यांनी सूत्रसंचालन केले. महालक्ष्मीच्या अध्यक्षा उत्कर्षा पोतदार यांनी आभार मानले. यावेळी सहायक निबंधक कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
09/07/2025 Page No. 5